महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

जावक क्रमांक – ४८९/१३ दिनांक :- ७ फेब्रुवारी, २०२५

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा नाशिक मंडळातर्फे ४९३ सदनिकांच्या विक्रीसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ

- मंडळाचे सभापती रंजन ठाकरे यांच्या शुभहस्ते सोडतीचा गो लाईव्ह समारंभ
- २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील ४९३ सदनिकांपैकी २०२ सदनिका प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत विक्रीस उपलब्ध

मुंबई, दि. ७ फेब्रुवारी, २०२५ :- नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) नाशिक मधील मखमलाबाद शिवार, सातपूर शिवार, पाथर्डी शिवार, विहितगाव शिवार, हिरावाडी, म्हसरुळ शिवार, तपोवन द्वारका, वडाळा नाशिक शिवार, पिंपळ गाव बहुला, नांदुर दसक, देवळाली, मौजे दसक या ठिकाणी विविध २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील ४९३ सदनिकांच्या विक्रीकरिता ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ मंडळाचे सभापती श्री. रंजन ठाकरे यांच्या हस्ते आज 'गो - लाईव्ह' कार्यक्रमांतर्गत करण्यात आला.

नाशिक मंडळाच्या कार्यालय समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला मंडळाचे मुख्य अभियंता श्री धिरजकुमार पंदिरकर, मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. शिवकुमार आवळकंठे, उपमुख्य अधिकारी श्री. संदीप कराळे आदी उपस्थित होते.

यावेळी नाशिक मंडळाचे सभापती रंजन ठाकरे यांच्या हस्ते सदनिका सोडतीसंदर्भातील माहिती पुस्तिकेचे अनावरणही करण्यात आले. सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्याकरिता नियमावली, मार्गदर्शक सूचना या पुस्तिकेत नमूद करण्यात आल्या आहेत. ही पुस्तिका https://lottery.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर इच्छूक अर्जदारांकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व इच्छूक अर्जदारांनी अर्ज नोंदणी व अर्ज भरणा करण्याआधी या माहिती पुस्तिकेचे अवलोकन करण्याचे आवाहन श्री. ठाकरे यांनी याप्रसंगी केले.

यावेळी श्री. ठाकरे यांनी नाशिक मंडळाच्या सोडतीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना आवाहन केले आहे की, मंडळातर्फे सदनिकांच्या वितरणासाठी कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये तसे केल्यास नाशिक मंडळ अथवा म्हाडा प्रशासन कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही.

तसेच म्हाडाची IHLMS 2.0 ही संगणकीय प्रणाली अत्यंत पारदर्शक , सोपी व सुलभ आहे करिता इच्छुक अर्जदारांनी याच सोडत प्रणालीच्या सहाय्याने सोडत प्रक्रियेमध्ये सहभाग घ्यावा, असेही ते पुढे म्हणाले.

दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपासून ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात झाली असून, दिनांक ६ मार्च , २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी करता येणार आहे. नोंदणीकृत अर्जदारांना दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. दिनांक ७ मार्च , २०२५ रात्री ११.५९ पर्यंत ऑनलाइन अनामत रकमेची स्वीकृती केली जाणार आहे. दिनांक ७ मार्च , २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS/NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांच्या अंतिम यादीची प्रसिद्धी दिनांक १३ मार्च, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर केली जाणार आहे.

नाशिक मंडळाची ही सोडत दोन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. सोडतीत २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत एकूण २९१ सदनिकांचा समावेश असून ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा करण्यासाठी https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळाला इच्छुक अर्जदारांनी भेट द्यावी.

तसेच २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत २०२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अनामत रकमेचा भरणा अर्जदाराने करण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial


४९३
सदनिकांच्या
ऑनलाईन
सोडतीचा
शुभारंभ
२०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना
मा.ना.श्री. अजित पवार
मा.श्री. संजीव जयस्वाल


४९३
सदनिकांच्या
ऑनलाईन
सोडतीचा
शुभारंभ
GO LIVE


नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक
MHADA
४९३ सदनिकांच्या ऑनलाईन सोडतीचा शुभारंभ
GO LIVE

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

Outward No. : 489/13 Dt. February 7, 2025

Press Release

# MHADA Nashik Board opens online appplications for 493 affordable homes under 20% inclusive housing plan

**The application process officially begins with the Go-Live ceremony led by Nashik Board Chairman Shri Ranjan Thakre**

Mumbai, February 7, 2025: The Nashik Housing and Area Development Board, a unit of MHADA, has today started the online registration and application process for the sale of 493 homes under the 20 Percent Inclusive Housing Scheme in different parts of Nashik including 202 flats under the First Cum First serve basis. The lottery process was officially launched today by Shri Ranjan Thakare, Chairman, Nashik Board, at a special Go-Live event held at the Nashik Board Office Committee Hall. These housing schemes for economically weaker section (EWS) and Lower Income Group (LIG) category are located in Makhmalabad Shivar, Satpur Shivar, Pathardi Shivar, Vihitgaon Shivar, Hirawadi, Mhasrul Shivar, Tapovan Dwarka, Wadala Nashik Shivar, Pimpalgaon Bahula, Nandur Dasak, Deolali, and Mouje Dasak.

The event was attended by Shri Dhirajkumar Panditkar, Chief Engineer/MHADA, Shri Shivkumar Awalkanthe, Chief officer, Nashik Board and Shri Sandeep Karale, Deputy Chief Officer, Nashik Board among other officers.

On this occasion, Shri Thakre released the official information booklet related to the housing lottery. The booklet outlines the eligibility criteria, application rules, and guidelines for participation in the process. It is available for applicants on MHADA's official website at

https://lottery.mhada.gov.in. Speaking on the occasion he urged all aspiring applicants of Nashik Board Lottery to thoroughly review the booklet before submitting their applications.

Shri Thakre further emphasized that MHADA has not appointed any representatives, consultants, or property agents for the allocation of these homes. He cautioned applicants against engaging with unauthorized individuals and clarified that MHADA will not be responsible for any fraudulent transactions. He also stated that the IHLMS 2.0 computerized lottery system is transparent, simple, and user-friendly, and applicants must only participate through the official online system.

The online application process started today at 2:30 PM and will remain open until 5:00 PM on March 6, 2025. Registered applicants can submit their applications online until 11:59 PM on March 6, 2025. The deadline for the deposit of the application fee through online payment is March 7, 2025, until 11:59 PM. Applicants choosing to pay the deposit via RTGS/NEFT must ensure that their payments are completed within banking hours on March 7, 2025.The final list of approved applications will be published on March 13, 2025, at 6:00 PM on MHADA's official website https://housing.mhada.gov.in.

This lottery process is divided into two categories under the 20 Percent Inclusive Housing Scheme. A total of 291 homes are available under the general 20 Percent Inclusive Housing Scheme, and applicants can submit their applications at https://housing.mhada.gov.in Additionally, 202 homes are available under the First-Come, First-Served Scheme, and interested applicants must register and submit their deposits via https://lottery.mhada.gov.in

The Nashik Board encourages all aspiring applicants to complete their applications within the stipulated time and take advantage of this housing opportunity.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

X @mhadaofficial Facebook @mhadaofficial Instagram @mhadaofficial YouTube @mhadaofficial